# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.

माहितीचा अधिकार

जा.क्र.मनपा/आस्था/मा.अ./ १५३/2018 दि. २०/ ७ /2018

प्रति,

श्री. सचिन संगित साळुंके,
रुम. नं.4, 1 ला मजला,
ओमकार सोसायटी, मोर्वा गाव,
उत्तन रोड, भाईंदर (प.),
ता.जि.ठाणे-401 101.

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका वर्ग-4 च्या कर्मचाऱ्यांबाबत.

संदर्भ :-
1. आपला दि.25/07/2017 रोजीचा माहितीचा अधिकार अंतर्गत अर्ज. (प्राप्त दि.22/08/2017)
2. जा.क्र.माअधि/अपिल/125/2017-18, दि.22/09/2017 रोजीचा प्रथम अपिलीय निर्णय. (प्राप्त दि.28/09/2017)
3. आपले दि.10/10/2017 रोजीचे पत्र.
4. मा.आयुक्त सो., राज्य माहिती आयोग, कोकण खंडपीठ यांना क्र.मनपा/आस्था/मा.अ/153/2017, दि.14/12/2017 रोजी इकडील विभागाकडून देण्यात आलेले पत्र.
5. क्रमांक :केआर-5015/2017, दि.30/05/2018 रोजीचा व्दितीय अपिल निर्णय (प्राप्त दि.06/07/2018)

महोदया,

उपरोक्त संदर्भिय विषयांन्वये आपणास कळविण्यात येत की, केंद्र शासन माहिती अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका वर्ग-4 च्या कर्मचाऱ्यांबाबत संदर्भ पत्र क्र.01 अन्वये मुद्दा क्र.01 ते 09 ची माहिती अपेक्षिलेली होती.

सदरची माहिती विहित मुदतीत न दिल्याने अर्जदाराने संदर्भ पत्र क्र. 2 अन्वये प्रथम अपिल सादर केले आहे. संदर्भ क्र.3 अन्वये अर्जदार यांनी सदर माहितीत्वरीत मिळावी याबाबत कळविले आहे. तदनंतर अपिलीय अर्जदार यांनी स्वत: आस्थापना विभागात येऊन उपलब्ध अभिलेख पडताळणीकरीता उपस्थित करुन दयावा, याबाबत मी आपणास निश्चित तारीख कळविन असे सांगितले.

त्यानुसार अर्जदार यांना संदर्भ पत्र क्र.4 अन्वये नव्याने केलेल्या वर्ग-04 च्या सेवा जेष्ठता यादीबाबत दि.19/12/2017 रोजी सकाळी 11.00 वाजता मुख्यकार्यालय, तिसरा मजला, आस्थापना विभाग, भाईंदर (प) येथे अभिलेख पडताळणीस उपस्थित राहुन अभिलेख पडताळणीअंती आवश्यक असलेल्या माहितीच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्यात येतील, असे कळविण्यात आले होते. सदर दिवशी अर्जदार हे उपस्थित न राहील्याने भ्रमणध्वनी क्र.9082433413 यावर दोनवेळा संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. परंतु अर्जदाराने फोन उचललेला नाही. दरम्यानच्या काळात संदर्भ पत्र क्र.05 अन्वये व्दितीय अपिल दाखल केले. व्दितीय अपिल सुनावणीच्या वेळी मा. आयुक्त सो, राज्य माहिती आयोग, कोकण खंडपीठ,

कोकण भवन, बेलापुर, नवी मुंबई यांना संदर्भ पत्र क्र.04 अन्वये माहिती सादर करण्यात आली आहे.

क्रमांक:केआर-5015/2017, दि.30/05/2018 रोजीचा व्दितीय अपिल निर्णयानुसार अपिलीय अर्जदार यांना मुद्दा क्र.01 ते 09 ची माहिती खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

मुददा क्र.01 :- मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील गट-ड संवर्गातून गट-क मधील लिपीक पदावर पदोन्नती देण्यासाठी अर्हता धारण करीत असलेल्या कर्मचाऱ्यांची अंतिम सेवा ज्येष्ठता यादी सोबत पृष्ठ क्र.01 ते 04 अन्वये जोडुन देण्यात येत आहे. परंतु मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-2014 नुसार लिपीक/टंकलेखक या पदावर पदोन्नती ही शिपाई कर्मचाऱ्यांमधुन भरण्याची तरतुद आहे. त्यामुळे लिपीक/टंकलेखक या पदावर पदोन्नती देण्यासाठी सदर यादी ग्राहय धरण्यात येत नाही.

मुददा क्र.02 :- सेवा ज्येष्ठता यादीमधील कर्मचाऱ्यांचे एम.एस.सी.आय.टी., मराठी टायपिंग, इंग्रजी टायपिंग या शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती सोबत पृष्ठ क्र.05 ते 168 अन्वये जोडुन देण्यात येत आहे.

मुददा क्र.03 :- आपण अपेक्षिलेली माहिती, महिती अधिकार शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण 2012/989/प्र.क्र.479/सहा. दि.17 ऑक्टोंबर, 2014 चा परिपत्रकानुसार अधिनियम 2005 मधिल पोटकलम 8(त्र) अन्वये नाकारण्यात येत आहे.

मुददा क्र.04 :- मुददा क्र.02 मध्ये नमुद आहे.

मुददा क्र.05 :- आपण अपेक्षिलेल्या माहितीची यादी उपलब्ध नाही.

मुददा क्र.06 :- मुददा क्र.01 प्रमाणे आहे.

मुददा क्र.07 :- पदोन्नती बाबत हरकती घेण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची यादी सोबत पृष्ठ क्र.169 ते 171 अन्वये जोडुन देण्यात येत आहे.

मुददा क्र.08 :- मुददा क्र.02 मध्ये नमुद आहे.

मुददा क्र.09 :- लिपीक पदोन्नतीबाबत सद्यस्थितीत कार्यवाही चालु नाही.

आपला विश्वासू,

(सुर्यकांत दातीर)
तत्कालीन जनमाहिती अधिकारी
तथा आस्थापना अधीक्षक
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत माहितीस्तव :-
मा.आयुक्त सो.,
राज्य माहिती आयोग,कोकण खंडपीठ,
पाचवा मजला,दालन क्र.528,
कोकण भवन,बेलापुर, नवीमुंबई - 400 614.

D:\Samir\All letter